


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६३५. वा | शनिवार | दि. २३ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# मनोज जरांगे पाटील यांच्या आंतरवाली सराटीत मंत्र्यांचे बंगले बांधा - छगन भुजबळ...

## मनोज जरांगे - पाटील यांच्यावर छगन भुजबळांची उपरोधिक टीका


वृत्तसंस्था/मुंबई

पत्नीकडील नातेवाईकांनाही कुणबी दाखला द्या या जरांगे - पाटील यांच्या नव्या मागणीनंतर सरकारची आणि त्यांची बोलणी फिस्कटली आहेत. ही बोलणी करण्यासाठी राज्य सरकारचे काही मंत्री २१ डिसेंबरला जरांगेंकडे वाटाघाटींना गेले होते. यावरच बोट ठेवत सरकारमधलेच मंत्री छगन भुजबळ यांनी उपरोधिक टीका केली आहे. जरांगेंच्या अंतरवाली सराटीत मंत्र्यांचे बंगले बांधा असं खोचक वक्तव्य भुजबळांनी केलंय. सरकार आणि जरांगेंची बोलणी फिस्कटल्यावर छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषद घेत याप्रकरणी सविस्तर भाष्य केलंय. सरकारने काय वाटाघाटी केली? हे मला माहीत नाही. पण मला स्वतःला हे योग्य वाटत नाही. सुरुवातीला जरांगे पाटील म्हणाले, निजामशाहीतील लोकांना दाखले द्या, ते सरकारने मान्य केलं. नंतर मराठवाड्यातील लोकांना दाखले द्या, तेही मान्य झाले. मग संपूर्ण महाराष्ट्रासाठी त्यांनी मागणी केली, तीही मान्य झाली. आता ते आईकडच्या लोकांना दाखले द्या, आईकडच्या नातेवाईकांना दाखले द्या मग याही मागण्या आता मान्य कराफ़, असंही भुजबळ म्हणाले. ओबीसी प्रवर्गातून मराठ्यांना आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे - पाटील यांनी गेल्या अनेक दिवसांपासून लावून धरली आहे. तर, जरांगेंच्या या मागणीलाच राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी थेट विरोध केलाय. त्यामुळे गेले काही दिवस हे दोन्ही नेते एकमेकांवर सभा - पत्रकार परिषदांच्या माध्यमातून भाष्य करतायत. मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला २४ डिसेंबरचा अल्टीमेटम दिला असून आता पत्नीकडील नातेवाईकांना आरक्षण देण्याची त्यांनी मागणी केली आहे. अंतरवाली सराटीत मंत्र्यांचे बंगले बांधा छगन भुजबळ म्हणाले, आपण जरांगेचे ऐकलं पाहीजे. नाहीतर ते मोर्चा घेऊन येतील. आणखी काहीतरी करतील. त्यामुळे आपण व्याहींचे व्याही, त्यांचे व्याही यांना ताबडतोब आरक्षण दिलं पाहीजे. माझं तर म्हणणं आहे की, मंत्री महोदय सारखे सारखे त्यांना भेटायला अंतरवाली सराटी येथे जात आहेत. ते फार अडचणीचं होतं. त्यामुळे तिथे दोन-चार सरकारी बंगले बांधले पाहीजेत. मुख्य सचिवांचे एक कार्यालय तिथे स्थापन केले पाहीजे. जरांगेंनी सांगितल्यानंतर मंत्र्यांनी ऑर्डर काढून मुख्य सचिवांनी त्याला तात्काळ मंजुरी देऊन टाकावी. तसेच माजी न्यायाधीशांच्या समितीचेही कार्यालय तिथे थाटावे, म्हणजे जरांगे म्हणतात त्याप्रमाणे अहवाल तयार करता येईल. जरांगे पाटील यांच्या मागण्या तर्काला धरून आहेत, नियमाला धरून आहेत. सरकारच त्यांचे





काही ऐकत नाही, असे चित्र निर्माण झालेले दिसते. जरांगेच्या मागण्या तात्काळ मान्य केल्या पाहीजेत. जरांगेनी सरकारला वेठीस धरले आहे, असा प्रश्न माध्यमांनी विचारला असता भुजबळ म्हणाले की, जरांगेनी सरकारला वेठीस धरलेले नाही तर सरकारनेच जरांगेना वेठीस धरले आहे. तसेच मी याआधी केलेली माझी सर्व भाषणे मागे घेत असून जरांगेच्या अभिनव कल्पनांना मान्यता देत आहे. कायदे बदलून टाकावेत. पुढच्या मेळाव्यात मी त्यांच्याबाजूने भाषणे करणार आहे.फ़, असा उपरोधिक टोला भुजबळ यांनी लगावला. जरांगे पाटील यांच्यावर बोलत असताना भुजबळ म्हणाले की, ही माझी हतबलता म्हणा, मी घाबरलो म्हणा काहीही म्हणा. पण जरांगे यांनी उद्या एससी / एसटीमध्ये आरक्षण मागितले तर त्यातही त्यांना आरक्षण देऊन टाका, असे भुजबळ म्हणाले. तसेच आता आरक्षणाच्या बाबतीतच नाही, तर पुढे ते शेतकरी, शिक्षण आणि विकासाच्या बाबतीतही सूचना देतील. त्या आपल्याला ऐकायला हव्यात. जरांगे यांच्यापाठी मराठा समाजाचे एवढे मोठे पाठबळ आहे, ते सरकारच्या विरोधात गेले तर कसं होईल? सरकारला काही भीती वाटते की नाही? त्यामुळे सरकारने त्यांच्या मागण्या मान्य केल्या पाहीजेत, असेही भुजबळ म्हणाले.




## वाघाळा येथून विद्यार्थिनींना सावखेड नागरेपर्यंत करावी लागते पायपीट



जनसंचलन/ सिंदखेडराजा

चिखली ते बीबी मार्गे वाघाळा जाण-ारी बस गेल्या एक महिन्यापासून बंद असल्यामुळे विद्यार्थ्यासह नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत .सा-वखेड नागरे येथे श्रीमती प्रभावती काकू शिंगणे विद्यालयात हिवरा गडलिंग वाघाळा व इतर गावाच्या विद्यार्थी विद्यार्थिनी या शाळेत शिकतात. एक महिन्यापूर्वी चिखली ते बीबी ही बस सेवा चालू होती त्यामुळे प्रत्येकाकडे पासेस आहेत परंतु एक महिना पासून ही बस सेवा अचानक बंद केल्यामुळे या शालेय विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.ऐन थंडीच्या दिवसांमध्ये वाघाळा पासून सावखेड पर्यंत दररोज लहान विद्यार्थी सह अनेक विद्यार्थ्यांना सावखेड नागरे पर्यंत दररोज पायपीट करावी लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच पायपीट करत असताना एखादा अनुचित प्रकारही घडू शकतो त्यामुळे याला जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे. वारंवार चिखली आगार प्रमुखाला निवेदन देण्यात आली परंतु या नियोजन शून्य कारभारामुळे या गोष्टीकडे अधिकारी अक्षम्य दुर्लक्ष करत असून नागरिकासह विद्यार्थी आंदोलन करण्याच्या पवित्र्यात आहेत. त्याकरिता ही बस सेवा पुन्हा पूर्ववत करावी अशी मागणी शाळेचे मुख्याध्यापक श्री अनंत कुमार खरात सह विद्यार्थी व गावकऱ्यांनी केली आहे. दखल न घेतल्यास विद्यार्थ्यासह गावकरी उपोषण करणार


दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजनेचा लाभ घ्या जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील...

**जनसंचलन/ बुलढाणा**

शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना लागू केली असून, त्यात शेती करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे आदी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, तसेच इतरही विविध अपघातांमध्ये शेतक-याचा मृत्यू झाल्यास अथवा दिव्यांगत्व येते. त्यामुळे त्या कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होते. अशा कुटूंबांना आर्थिक मदतीचा लाभ मिळवण्यासाठी त्यांच्या वारसांनी गोप-ीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. अपघातग्रस्त शेतकरी कुटुंबास हा लाभ देण्यासाठी वहितीधारक खा-तेदार शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले शेतक-याच्या कुटुंबातील कोणताही १ सदस्य (आई-वडील, शेतक-याची पती पत्नी, मुलगा व अविवाहीत मुलगी यापैकी कोणतीही एक व्यक्ती) असे १० ते ७५ वर्षे वयोगटातील एकूण दोघांसाठी ही योजना राबविण्यात येत आहे. ही योजना १९ एप्रिल २०२३ ते आवश्यकतेनुसार प्रथम ३ वर्षे राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये अपघाती मृत्यू अथवा अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय निकामी होणे, अपघातामुळे एक निकामी होणे डोळा व एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास दोन लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान मिळते तर अपघातामुळे एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास त्यास एक लाख रुपयांचा लाभ मिळतो. रस्ता रेल्वे अपघात, पाण्यात बुडून मृत्यू, जंतूनाशके हाताळतांना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा, विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात, वीज पडून मृत्यू, खून,उंचावरून पडून झालेला अप-घात, सर्प,विंचूदंश, नक्षलवाद्यांकडून झालेल्या हत्या,जनावरांचे हल्ले, चावण्यामुळे जखमी किंवा मृत्यू,बाळंतपणातील मृत्यू, दंगल आदी अपघातांचा समावेश आहे. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुद-ान योजनेअंतर्गत वारसदाराची निवड करताना अपघातग्रस्ताची पत्नी, स्त्रीचा पती, त्याची अविवाहित मुलगी, आई, मुलगा, वडील, सून किंवा अन्य कायदेशीर वारसदाराचा समावेश होतो. अनुदान योजनेअंतर्गत लाभ प्राप्तीसाठी अर्जासोबत ७/१२ उत-ारा, मृत्यूचा दाखला, शेतकऱ्यांचे वारस म्हणून गावकामगार तलाठ्याकडील गाव नमुना नं. ६ क नुसार मंजूर झालेली




वारसाची नोंद, वारसदाराचे ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुक, निवडणूक ओळखपत्र, अपघातग्रस्ताचा वयाचा दाखला यामध्ये जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, शाळेच्या मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र, ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र, वाहन चालविण्याचा परवाना, पारपत्रापैकी कोणतेही एक कागदपत्र तसेच प्रथम माहिती अहवाल, घटनास्थळ पंचनामा, पोलिस पाटील माहिती अहवाल आणि अपघाताच्या स्वरूपानुसार अंतिम विमा प्रस्तावासोबत ही कागदपत्रे अर्जासोबत ३० दिवसांच्या आत सादर करावीत. अधिक माहितीसाठी कृषि विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

# रविंद्र लहाने यांची स्वीय सहायक गट- ब राजपत्रितवर पदोन्नती



**जनसंचलन /बुलढाणा**

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम पाहत असलेले रविंद्र लहाने यांची उच्च श्रेणी लघुलेखक या पदावरून स्वीय सहाय्यक - गट-ब राजपत्रित पदावर सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती झाली आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याकडून पदोन्नती झाल्याबद्दल रवींद्र लहाने यांचा शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला तसेच कार्यालयातील तसेच इतर विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच मित्रमंडळ, नातेवाईक यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. श्री. लहाने यांची महसूल विभागात ३० वर्षे सेवा झाली असून, यापू-र्वी त्यांनी सेवा कार्यकाळात सन १९९४ ते १९९८ या वर्षात अध्यक्ष, प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ, अमरावती प्रदेश यांचे स्वीय सहाय्यक म्हणून तसेच सन २०१४ ते २०१९ या कालावधीत तत्कालीन अन्न नागरी पुरवठा व संसदीय कार्यमंत्री गिरीश बापट, तसेच आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्याकडेही स्वीय सहाय्यक म्हणून काम केलेले आहे. त्यांचा कार्यालयीन कामकाजासोबतच सामाजिक क्षेत्रातील कामांमध्ये हिरिरीने सहभाग असतो.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ४.००% | ४.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस | | ७.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ७.००% | ७.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत | | ८.००% | ७.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर | | ८.००% | ७.००% |
| ६ | डबल बम्पर ठेव योजना | | ७.००% | – |
| ७ | २४ महिन्यांच्या वर | | ७.००% | ७.००% |
| ८ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ९ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | – |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ६.००% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

रू. ५ लाख पर्यंतच्या ठेवींना डि.आय.सी.सी.चे संरक्षण कवच प्राप्त आहे.



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# जिल्ह्यात नाफेडची पाच तूर खरेदी केंद्र सुरु

## नोंदणी करण्याचे जिल्हा पणन विभागाचे आवाहन...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात हंगाम २०२३-२४ मध्ये नाफेडच्या वतीने पीएसएफ योजनेअंतर्गत बाजार भावाने तूर खरेदी करण्यासाठी शेतकरी नोंदणी सुरू झाली असून, तूर खरेदी नोंदणीसाठी नाफेडने जिल्ह्यामध्ये तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री समिती मर्यादित बुलढाणा, लोणार, मेहकर, शेगाव आणि संग्रामपूर आदी पाच ठिकाणी खरेदी केंद्रांना मान्यता दिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा पणन अधिकारी एम. जी. काकडे यांनी केले आहे.

हंगाम २०२३-२४शासनाच्या पीएसएफ योजनेअंतर्गत पणन महासंघाच्या पीएसीएस संस्थांव्दारे तूर खरेदी करायची असून, त्यासाठी १३ डिसेंबरपासून नोंदणी सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर नोंदणी करण्यासाठी आधारकार्ड, खरीप २०२३-२४चा ७/१२ ऑनलाईन पिकपेरासह, बँक पासबुकाची आधारलिंक केलेली झेरॉक्स, मोबाईल नंबर घेऊन कागदपत्रे स्कॅन करुन नोंदणी करावी. तसेच हाताने लिहिलेले ७/१२ व खाडाखोड केलेले कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत स्विकारण्यात येणार नाहीत. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अर्ज स्विकारली जाणार नाहीत. तसेच कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन ७/१२ वरील तूर पिकपेऱ्यापेक्षा जास्त क्षेत्रावर नोंदणी करण्यात येणार नाही. तसे झाल्यास यास खरेदी केंद्र जबाबदार राहील, असेही जिल्हा पणन अधिकारी एम. जी. काकडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी तूर नोंदणी करुन पीएसएफ योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# बुलडाण्यात एकाच कुटुंबातील तिघांची प्रकृती अचानक बिघडली !



जनसंचलन/बुलढाणा

शहरातील सराफा लाईन परिसरातील आंबेकर परिवारात दि २२ डिसेंबरच्या सकाळी १० वाजेच्या सुमारास एक विचित्र घटना घडली. त्यामध्ये कुटुंबातील तिघांची अचानकपणे प्रकृती बिघडल्याने त्यांना सामान्य रुग्णालयात आणण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. याबाबत सविस्तर माहिती अशी की,कुटुंबातील आरती आंबेकर (३२ वर्ष) यांना गॅसगिझर मुळे तसेच ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे (सपोकेशन) दम घोटणे सुरू झाले. त्यानंतर त्यांच्या तोंडातून फेस येत असतानाच त्याखाली कोसळल्या.. हे दृश्य पाहताच (आई-वडील) ज्योती आंबेकर, विनायक आंबेकर हादरून गेले. ते सुद्धा जमिनीवर कोसळले. त्यानंतर परिसरातील नागरिकांनी ॲम्बुलन्स च्या साह्याने त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविले. येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे सदर प्रकार घडल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र हे सर्व घडले असताना शहरात एकच खळबळ उडाली होती की , कुटुंबातील सर्वांनी विष प्राशन केले आहे. मात्र तसा कुठलाही प्रकार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

# अकोल्यात बुधवारपासून राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन...



जनसंचलन/बुलढाणा

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषि विभाग व आत्मा, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय कृषि प्रदर्शन व कृषि महोत्सव अग्रोटेक-२०२३चे २७ ते २९ डिसेंबर, २०२३ दरम्यान विद्यापीठ क्रीडांगण येथे आयोजन करण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख कृषि विज्ञान केंद्राकडून करण्यात आले आहे.

प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते (दि.२७) बुधवारी सकाळी १० वाजता होणार असून हे प्रदर्शन सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत सुरू राहणार आहे. या प्रदर्शनामध्ये विविध कृषि निविष्ठांचे ३०० दालने शेतकरी बंधू-भगिनींना माहिती देणार आहेत. तसेच तिन्ही दिवस विविध विषयावर चर्चासत्र आणि कृषि प्रबोधन कार्यक्रम होणार आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रेमी युगालाची गळफास घेऊन आत्महत्या...

जनसंचलन / साखरखेर्डा

प्रेमी युगालाची एका झाडाला दोघांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळ जनक घटना साखरखेर्डा शिवारात आज २२ डिसेंबर २०२३ रोजी उघडकीस आली. प्रेमाला घरच्यांचा विरोध असल्याने अखेर या प्रेमीयुगुलाने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. गळ्यात गळे घालून दोघांनी जगाचा निरोप घेतला. विशेष म्हणजे या घटनेतील मुलगी केवळ ८ व्या वर्गात शिकणारी १३ वर्षांची विद्यार्थिनी आहे. दोघेही गेल्या ४ दिवसापासून बेपत्ता होते.

प्राथमिक माहितीनुसार मुलीचे नाव साक्षी संतोष अंभोरे (१३ वर्ष रा. शेंदुर्जन) असे आहे तर मुलाचे नाव गोपाल समाधान खिल्लारे(२२) असे आहे. दोघेही शेंदुर्जन येथील रहिवासी असल्याचे सूत्रांनी सांगितले. साखरखेर्डा शिवारातील एका झाडाला दोघांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. दोघेही १८ डिसेंबर पासून बेपत्ता होते. मुलीच्या आईने १८ डिसेंबरला साखरखेर्डा पोलीस ठाण्यात त्यांची मुलगी गायब झाल्याची तक्रार दिली होती. त्यावरून त्याच दिवशी पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता.

दरम्यान आज २२ डिसेंबरला संध्याकाळी एका मुलीचा आणि मुलाचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसल्याने एकच खळबळ उडाली. पोलिस घटनास्थळी पोहचल्यानंतर दोघांची ओळख पटली आहे. मुलगी अल्पवयीन असल्याने प्रेमात अडथळा येत होता, त्यामुळेच हा टोकाचा निर्णय घेतला असावा अशी शक्यता आहे. गेल्या ४ दिवसांपासून दोघे गायब असल्याने त्यांनी आत्महत्या कधी केली याबाबत अस्पष्टता आहे.



# लोकशाही दिनाचे सोमवारी आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

जानेवारी महिन्याचा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दि.१ जानेवारी २०२४ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. तक्रारदारांनी लोकशाही दिनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील अशा पाठवाव्यात, असे निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात यांनी कळविले आहे.




# प्राथमिक आरोग्य केंद्र अंढेरा अंतर्गत डेंगू सदृश्य तापेचे थैमान...

जनसंचलन / देऊळगावराजा

देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा येथील सेवानगर भागात मागील काही दिवसांपासून डेंग्यू सदृश्य तापाची लागण झाल्याने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले असुन तब्बल चार ते पाच रुग्ण हे चिखली येथील खाजगी दवाखान्यात उपचार घेत आहेत. याबाबत रुग्णांच्या नातेवाईकांकडून मिळालेल्या माहितीनुसार मागील काही दिवसांपासून सेवानगर येथील नागरिकांना तापाची लागण झाल्याने त्यांना उपचारासाठी चिखली येथे खाजगी दवाखान्यात उपचार घेण्यासाठी दाखल केले असता त्यांना डेंग्यू सदृश्य तापाची लागण झाल्याचे निष्पन्न झाले असून मागील गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर चिखली येथे उपचार सुरू असुन त्यातील दोघांना बुलढाणा येथे उपचारासाठी दाखल करावे लागले असुन या संपूर्ण घटनेने सेवानगर येथील नागरिकांमध्ये कमालीचे घबराटीचे वातावरण निर्माण झाले असुन गेल्या काही दिवसांपासून वातावरणातील बदलामुळे आणि थंडीमुळे सर्दी,ताप,खोकला यांच्या प्रमाणात वाढ झाल्याने आरोग्य विभागाने तात्काळ उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. तसेच सेवानगर येथे आरोग्य विभागाने तात्काळ अलर्ट होण्याची गरज निर्माण झाली आहे.आज निसर्गाच्या लहरीपणा मुळे ग्रामीण भागामध्ये बेरोजगार वाढली आहे आणि त्यामध्ये अंढेरा येथील सेवानगर येथे डेंग्यू सदृश्य तापेचे थैमान सुरू झाले आहे ग्रामीण भागामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र असून सुद्धा नियोजन शून्य कारभारामुळे ग्रामीण भागामध्ये प्राथमिक उपचार मिळत नसल्यामुळे त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे

# मराठा आरक्षणाचा विषय गांभीर्याने घ्या...

## लेकरांच्या हितासाठी मराठा कोणत्याही टोकाला जाऊ शकतो: जरांगे पाटील



**वृत्तसंस्था/ परभणी**

मराठे तुमचेच आहेत. यांनीच तुम्हाला गादीवर बसविले आहे. तुम्ही जाणूनबुजून मराठ्यांना वाकड्या वाटेला जाऊ देऊ नका. आणखीही संधी, वेळ गेलेली नाही. दोन दिवस हातात आहेत. सरकारने गैरसमजातून बाहेर यावे. मराठा आरक्षणाचा विषय गांभार्याने घ्यावा, तोडगा काढायचा प्रयत्न करावा. विनाकारण नोटीसा बजावून आता जास्तीच मराठ्यांना संतप्त होऊ देऊ नका, असे आवाहन मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सेलू (जि. परभणी) येथील सभेत शुक्रवारी सरकारला केले. सेलू तालुक्यातील अखंड मराठा समाज बांधवांच्या वतीने नूतन महाविद्यालयाच्या मैदानावर गाठी-भेटी दौऱ्यांतर्गत शुक्रवारी दुपारी साडेबारा वाजता जाहीर सभा आयोजिण्यात आली होती. त्यावेळी जरांगे पाटील बोलत होते. भरउन्हात सभेला लाखोंच्या संख्येने मराठा जनजागर लोटला होता. प्रारंभी छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यावर पुष्पवृटी करून जरांगे यांनी अभिवादन केले. मराठा भगिनींनी जरांगेंचे औक्षण केले. सेलू तालुक्यातील डिग्रस बरसाले येथील हुतात्मा अनंत लेवडे यांच्या आईवडिलांच्या हस्ते जरांगे यांचा सन्मान करण्यात आला.सरकारने आता तरी भानावर यावे. नोटिसा देऊन पुन्हा प्रयोग करायचा प्रयत्न करून नये. महाराष्ट्रात फिरणे मुश्किल होईल, असा इशारा देऊन जरांगे पाटील म्हणा-ले, की कायद्याच्या चौकटीत राहून आरक्षणाची मागणी सुरू आहे. १९६७ च्या आधीपासूनचे पुरावे सापडले आहेत. गायकवाड आयोगाने मराठ्यांना बारा-तेरा टक्क्यांनी मागास सिद्ध केले. सर्व निकष पूर्ण केले तरीही मराठ्यांना आरक्षण नाही. ज्यांनी निकष पूर्ण केले नाहीत, तरी त्यांना आरक्षणात घेतले. ज्या लेकरांची एका टक्क्याहून संधी हुकली. त्या लेकराचे आयुष्य आणि भविष्य उध्दस्त झाले आहे, याची जाणीव असू द्या. मराठ्यांच्या डोक्यात आले, तर लेकरांच्या हितासाठी मराठा कोणत्याही टोकाला जाऊ शकतो. पण मराठ्यांनाही मर्यादा आहेत, असा निर्वाणीचा इशाराही जरांगे यांनी सभेतून दिला. आरक्षणासाठी मराठ्यांचा हा लढा अंतिम टप्प्यात आहे. ८० टक्के लढाई जिंकली आहे. त्यामुळे बेसावध राहू नका. अशी संधी पुन्हा येणार नाही. तुम्ही खांद्याला खांदा लावून लढा. मी मरायला भीत नाही. आता बेसावध राहू नका. एकजूट दाखवा. गावेची गावे पिंजून काढा. जागृती करा. महिलांनीही मागे हटू नका. २३ डिसेंबरपासून महिलांनीही दररोज आरक्षणाचा जागर घालायला सुरूवात करावी, असे आवाहन जरांगे यांनी केले. दरम्यान, जरांगे यांचे ३१ जेसीबीतून पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. सभास्थळी चोहोबाजूंनी मोठ्या संख्येने मराठा समाजबांधव उपस्थित होते. घराच्या छतावर, रस्त्यारस्त्यावर, नूतन महाविद्यालयाच्या सागवान झाडांच्या प्रकल्पात बसूनही मराठा बांधवांनी सभेला हजेरी लावली. समितीला ५४ लाख मराठा आरक्षणासाठीच्या कुणबी नोंदी मिळाल्या आहेत. याच नोंदीप्रमाणे अहवाल स्वीकारून सरकारला कायदा करायला काय अडचण आहे, असा प्रश्न मनोज जरांगे यांनी उपस्थित केला. याच नोंदी सत्तर वर्षापूर्वी मराठ्यांना दिल्या असत्या, तर आरक्षणामुळे मराठा समाज प्रगत म्हणून जगात पुढे आला असता, परंतु जाणूनबुजून आरक्षण दिले नाही. नोंदी असूनही कुळापासून लपवून ठेवल्या, असा घणाघात जरांगे यांनी या वेळी केला. सभास्थळी ङ्म२५ डिसेंबरला मुंबईतफ, अशा आशयाचे बॅनर झळकले होते. मुंबईतील आंदोलनाबाबत सकाळी पत्रकार परिषदेतही मनोज जरांगेंना पत्रकारांनी विचारणा केली. परंतु, जरांगेंनी यावर भाष्य टाळले. मात्र, जाहीर सभेत मिश्किल भाषेत टिप्पणी करून मुंबई गाठायचा इरादा पक्का केल्याचे दिसून आले.

## काँग्रेस नेते, माजी मंत्री सुनील केदार यांना ५ वर्षांची शिक्षा...

**वृत्तसंस्था/ नागपूर**

काँग्रेस नेते आणि माजी मंत्री सुनील केदार यांच्या बहुचर्चित व बहुप्रतिक्षीत नागपूर जिल्हा बँक घोटाळ्यात केदार यांना ५ वर्षांच्या कारावासाची आणि १२.५० लाख रुपये शिक्षा सुनावण्यात आली आहे. या घोटाळ्यातील अन्य आरोपींनाही शिक्षा सुनावण्यात आली आहे. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत २००२ साली १५६ कोटींहून अधिक रुपयांचा घोटाळा उघडकीस आला होता. तेव्हा केदार बँकेचे अध्यक्ष होते. ते या खटल्यातील मुख्य आरोपीसुद्धा आहेत. १९९९ साली सुनील केदार हे नागपूर जिल्हा बँकचे अध्यक्ष झाले. बँकेच्या रकमेतून २००१-०२मध्ये होम ट्रेड लिमिटेड मुंबई, इंद्रमणी मर्चंट्स .लि. आणि अन्य काही कंपन्यांकडून सरकारी प्रतिभूती खरेदी करण्यात आल्या होत्या. सहकार विभागाचा कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करत ही रक्कम गुंतवण्यात आली होती. पुढे खाजगी कंपनी दिवाळखोरीत निघाल्याने बँकेतील शेतकऱ्यांचे पैसेही बुडाले होते. सुनील केदार, बँकेचे तत्कालीन महाव्यवस्थापक अशोक नामदेव चौधरी, तत्कालीन मुख्य हिशेबणीस सुरेश दामोदर पेशकर (नागपूर), रोखे दलाल केतन कांतीलाल सेठ, सुबोध चंदादयाल भंडारी, नंदकिशोर शंकरलाल त्रिवेदी (सर्व मुंबई), अमित सीतापती वर्मा (अहमदाबाद), महेंद्र राधेश्याम अग्रवाल व श्रीप्रकाश शांतीलाल पोद्दार (कोलकाता) यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले होते.पुढे या प्रकरणी मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयात खटला भरण्यात आला. या कंपनीशी निगडित एकूण चार राज्यांमध्ये १९ ठिकाणी गुन्हे दाखल झाले. त्या सगळ्यांमध्येच प्रतिभूती दलाल म्हणून काम करणारे केतन सेठ आरोपी आहेत. हे सगळेच खटले एका ठिकाणी चालवावेत, अशी मागणी करणारी याचिका त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यावर ५ ऑक्टोबर २०२१ रोजी न्यायालयाने तूर्त या खटल्यांची सुनावणी थांबविण्याचे आदेश दिले होते. मात्र, पुढे सर्वोच्च न्यायालयाने या आदेशात बदल केले. या खटल्यातील युक्तिवादाची शिल्लक असलेली प्रक्रिया



पूर्ण करावी, मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीखेरीज निकाल सुनावला जाऊ नये, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार सर्व पक्षांतर्फे युक्तिवाद पूर्ण करण्यात आला. वरिष्ठ वरिष्ठ अधिवक्ते सुबोध धर्माधिकारी आणि ॲड. देवेन चौहान यांनी केदारांकडून युक्तिवाद केला. याखेरीज चौधरी यांच्याकडून त्यांचे वकील अशोक भांगडे यांनी युक्तिवाद केला. अखेर, या प्रकरणाचा निकाल सुनावण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दिली. त्यानुसार, अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी जे. व्ही. पेखले-पूरकर मंगळवारी खटल्याचा निकाल सुनावला. दोन वर्षांपेक्षा अधिक शिक्षा झाल्यास आमदारकी रद्द होते. केदार यांना दोन वर्षांहून अधिक शिक्षा झाल्यामुळे त्यांची आमदारकी रद्द होऊ शकते.

## बुलडाणा, लोणार तालुक्यात दुष्काळसदृश्य सवलती लागू...

**जनसंचलन/बुलढाणा**



राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील बुलढाणा व लोणार तालुक्यामध्ये मध्यम स्वरुपाचा दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार दिनांक १० नोव्हेंबर २०२३ नुसार बुलढाणा जिल्ह्यातील ११ तालुक्यामधील ७३ महसुली मंडळामध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आली आहे. दुष्काळ घोषित झालेल्या तालुक्यांमध्ये जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती देणे, कृषी पंपांच्या चालू विज बिलात ३३.५ टक्के इतकी सूट, शालेय, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरवठ्यासाठी टँकर्सचा वापर आणि टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची विज जोडणी खंडीत न करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याला वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी

| Size | Rates | Height | Width |
|---|---|---|---|
| 8x8 cm | 1 Month=5000/-<br>15 Day=3500/-<br>7 Day=2000/- | Hight 8 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/-<br>15 Day=2200/-<br>7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/-<br>15 Day=2200/-<br>7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 23 cm |

एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Rate | Height | Width |
|---|---|---|
| 2600/- | Hight 12 cm | Width 12 cm |
| 1800/- | Hight 8 cm | Width 10 cm |
| 1300/- | Hight 8 cm | Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:

अजय राजगुरे-9922359674

ऑफिस नं.-9129582958

पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा

Mail Id: jansanchlan@gmail.com